पुणे तसेच पिंपरी-चिंचवड शहरामध्ये सीसीटीव्ही प्रकल्पाबाबत मे. एडीएसएल कंपनीस निधी वितरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः सीसीटी-०८१५/प्र.क्र.२७/पोल-३

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक

दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२

दिनांक: ३ नोव्हेंबर २०१५

वाचा :

१) मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची दि. १३.९.२०१३ रोजीची बैठक.

२) शासनाचे क्रमांक आयएसएस-१०१२/प्र.क्र.७१/विशा-४,दि.१७.९.२०१३ चे हेतू पत्र (Letter of Intent)

३) चीफ मॅनेजर (आसबीडी),स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा बॅकबे रेक्लेमेशन यांनी दि.३.१०.२०१३ चे पत्राद्वारे पाठविलेली दि. १०.३.२०१३ रोजीची बँक गॅरेंटी.

४) शासन निर्णय, गृह विभाग क्र. आयएसएस-१०१२/प्र.क्र.७१/विशा-४, दि. १४.१०.२०१३.

५) महाराष्ट्र शासन आणि मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. यांचे दरम्यान दि.२८.१०.२०१३ रोजी झालेला करारनामा

६) अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. यांचे दि.१६.६.२०१५ रोजीचे पत्र.

७) अपर मुख्य सचिव, गृह यांचे अध्यक्षतेखालील दि. ८.५.२०१५ व दि. ४.८.२०१५ रोजीची बैठक.

८) मे. प्राईसवॉटर कूपर्स कं. यांचा दि. २०.६.२०१५, दि.५.८.२०१५ व दि.८.९.२०१५ रोजीचा ई-मेल संदेश.

९) पोलीस आयुक्त, पुणे यांचे क्र. बी/१०/सीपी/एसटी/(००५१)/२०१५, दि. ५.८.२०१५ रोजीचे पत्र व जा. क्र. /प्रलि-३/सीसीटीव्ही सदयस्थिती/२०१५/२१७२, दि.१४.९.२०१५ रोजीचे पत्र.

१०) शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी-०८१५/प्र. क्र.२७/पोल-३, दि.६.८.२०१५ व समक्रमांकाचे शुध्दीपत्रक दि.१०.८.२०१५

११) शासन पत्र, गृह विभाग, क्र. सीसीटी-८१५/प्र. क्र. २७/भाग-२/पोल-३, दि.२७.१०.२०१५.

<u>प्रस्तावना :</u>

पोलीस आयुक्त, पुणे यांचे अधिनस्त, पुणे व पिंपरी-चिंचवड शहरांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याबाबत मे.अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. या कंपनीची अंतिम वाणिज्यिक निविदा मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्तीप्रदान समितीने दि. १३.९.२०१३ रोजीच्या बैठकीमध्ये मान्य केली होती. त्यानुसार सदरहू कंपनीला Letter of Intent दि. १७.९.२०१३ रोजी देण्यात आलेले होते. मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. या कंपनीने प्रकल्प किंमतीच्या १०% म्हणजे रु. २२,४३,००,०००.००/- एवढया रक्कमेची बँक गॅरंटी (स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक गॅरेंटी नं. ०१५९३१३BG०००००१८०, दि.१०.३.२०१३) दि.३.१०.२०१३ रोजी जमा केली आहे. सदर प्रकल्पास व त्यासाठी येणाऱ्या संभाव्य रु. २२५.०० कोटी इतक्या रक्कमेच्या खर्चास संदर्भाधीन क्र. ४ वरील दि.१४.१०.२०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर दि.१४.१०.२०१३ च्या शासन निर्णयान्वये प्रकल्पाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेसाठी पोलीस आयुक्त, पुणे यांचे अध्यक्षतेखाली प्रकल्प अंमलबजावणी समिती (Project Implementation Committee) स्थापन करण्यात आली आहे. मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. आणि महाराष्ट्र शासन यांचे दरम्यान दि.२८.१०.२०१३ रोजी करार करण्यात आला आहे. त्यानुसार सदरहू कपंनीने ४२ आठवडे कालावधीमध्ये सीसीटीव्ही कार्यान्वित करणेबाबतचे काम पुर्ण करणे बंधनकारक आहे. करारपत्रानुसार सदरहू कंपनीला देय असणारी रक्कम एकरकमी देय न करता, पुढील ६ वर्षाच्या कालावधीमध्ये (म्हणजेच प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर २०% आणि उर्वरित ८०% रक्कम २० समान हप्त्यामध्ये) अदा करणे बंधनकारक आहे.

मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. यांनी दि. १६.६.२०१५ चे पत्रान्वये CAPEX रक्कमेमधील साहित्यभागाचे १००% काम पुर्ण झाले आहे, अशा ठिकाणी वापरलेले साहित्य यावर आधारित रु.४५,०७,१५,००७/- एवढया रक्कमेची मागणी केली होती. त्यावर मे. PwC या सल्लागार कंपनीने दि.२०.६.२०१५ चे पत्रान्वये स्पष्ट केल्यानुसार, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी दि.५.८.२०१५ चे पत्रान्वये दिलेल्या अहवालानुसार आणि अपर मुख्य सचिव, गृह यांचे अध्यक्षतेखाली दि. ४.८.२०१५ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार तसेच मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. कंपनीची वित्तीय अवस्था व कंपनीने शासनाकडे ठेवलेली बँक गॅरेंटी विचारात घेऊन, प्रकल्पास गती येण्यासाठी आणि प्रकल्प पुर्णपणे

कार्यान्वित होणे या बाबीस अग्रक्रम देवून मे. अलाईड डिजिटल कंपनीला रु. १०.०० कोटी एवढी रक्कम दि.६.८.२०१५ व दि.१०.८.२०१५ (शुध्दीपत्रक) अन्वये अदा केली आहे. मा.मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते प्रस्तुत प्रकल्पाचा दि.८.८.२०१५ रोजी लोकार्पण कार्यक्रम पार पडला आहे. तसेच संदर्भाधीन क्र.११ वरील पत्रान्वये अंतिम स्वीकृती प्रमाणपत्र (Final Acceptance Test Certificate) आणि प्रकल्प कार्यान्वित (Go Live) घोषित केले आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेवून, करारपत्रामधील तरतुदींनुसार मे. अलाईड डिजिटल कंपनी लि. यांना देय होणारी रक्कम मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. आणि महाराष्ट्र शासन यांचे दरम्यान दि.२८.१०.२०१३ रोजी झालेल्या करारानुसार मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. कंपनीला देय असणारी रक्कम एकरकमी देय न करता, पुढील ६ वर्षाच्या कालावधीमध्ये (म्हणजेच प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर २०% आणि उर्वरित ८०% रक्कम २० समान हप्त्यामध्ये) अदा करणे बंधनकारक आहे. करारपत्रानुसार मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. कंपनीने सीसीटीव्ही यंत्रणा पुर्णपणे कार्यान्वित करण्याची कार्यवाही ४२ आठवडे कालावधीमध्ये पुर्ण करणे बंधनकारक आहे. सदर ४२ आठवडयांचा कालावधी दि.१८.८.२०१४ रोजी पुर्ण होतो. प्रकल्प कार्यान्वित होणेसाठी झालेल्या विलंबाबाबत दंडात्मक कार्यवाहीची तरतुद आहे. त्यानुसार दंडात्मक कार्यवाही करणेसाठी विलंबाची जबाबदारी निश्चित करुन दंडाची रक्कम निश्चित होईपर्यंत मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. यांना देय होणारी प्रकल्प किंमतीच्या २०% रक्कम रु.४४,८६,३०,०२१/- वजा संदर्भाधीन क्र.१० वरील दि. ६.८.२०१५ आणि दि.१०.८.२०१५ च्या शासन निर्णयान्वये अदा केलेली अंशत: रक्कम रु. १०,००,००,०००/- वजा करता रक्कम रु. ३४,८६,३०,०२१/- देय होत आहे. दंडात्मक रक्कमेची परिगणना निश्चित करण्यासाठी काही कालावधी लागणार असल्याने मे.अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. कंपनीस देय होणाऱ्या रक्कम रु. ३४,८६,३०,०२१/- पैकी रक्कम रु.२५,००,००,०००/- (अक्षरी रु. पंचवीस कोटी फक्त) (सर्व करांसहीत) एवढी रक्कम सद्यस्थितीत अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदरहू, रक्कम आहरीत करण्यासाठी पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना नियंत्रक अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यास येते आहे. त्यांनी उपरोक्त रक्कमेचा धनादेश "allied digital services limited" यांचे नांवे काढण्यात यावा.

३. प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च हा "मागणी क्र. बी-१०, ४०५५- पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००)(०९) सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही संनियंत्रण यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) योजनेतर योजना -५२ यंत्रसामग्री व साधनसामग्री" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो २०१५-१६ या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाचा शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र. क्र. ३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.४.२०१५ मधील वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८ भाग-पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व अनु.क्र. ४, नियम क्र.७ अन्वये प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारान्वये मंजूर करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५११०३१०५३३६२८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KADAM DATTATRAY HANMANT

Digitally signed by KADAM DATTATRAY HANMANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPT,CID - 918120, postalCode=400032, st=Maharashtra, cn=KADAM DATTATRAY HANMANT
Date: 2015.11.03 11:33:58 +05'30'

(द.ह. कदम)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अपर मुख्य सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई

२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

३. पोलीस आयुक्त, पुणे शहर, पुणे

४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर

५. आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे

६. आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे

७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे

१०.मे.अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि., प्रिमाईसेस नं. १३-ए, १३ वा मजला, अर्नेस्ट हाऊस, बॅकबे रेक्लेमेशन, एनसीपीए रोड, ब्लॉक III, नरीमन पाईंट, मुंबई-२१.

११.वित्त विभाग, व्यय-७/ वित्तीय सुधारणा

१२.निवडनस्ती, पोल-३

****